॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२४ वा | रविवार दि. १२ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# अनधिकृत पुतळे उभारणाऱ्यांवर कारवाई

## ग्रामपंचायत बॉडी बरखास्त होणार | पोलिस पाटलाचे 7 दिवसांत निलंबन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात वाढत्या अनधिकृत पुतळे उभारणीच्या घटनांवर अखेर जिल्हा प्रशासनाने कठोर पाऊल उचलले असून, नियमभंग करणाऱ्या ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांवर थेट अपात्रतेची कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच संबंधित गावच्या पोलिस पाटलाला सात दिवसांत निलंबित करण्याचे आदेश देत प्रशासनाने स्पष्ट संदेश दिला आहे की, कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही प्रकाराला आता सहनशीलता दाखवली जाणार नाही.

माढा तालुक्यातील अंजनगाव येथे अनधिकृत पुतळा उभारणीवरून सलग तीन दिवस तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने ही निर्णायक भूमिका घेतली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी संयुक्त परिपत्रक जारी करत संपूर्ण जिल्ह्यात कडक अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत.

### पोलिस पाटलांवर 'डेडलाईन'

ज्या गावातील पोलिस पाटील अनधिकृत पुतळ्याबाबत वरिष्ठांना माहिती देण्यात अपयशी ठरतील, त्यांच्यावर सात दिवसांत बडतफीर्ची कारवाई केली जाईल. यामध्ये तीन दिवसांचा स्पष्टीकरणाचा कालावधी देण्यात येणार असून त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. या कारवाईचा अहवाल उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला जाणार आहे.

### माहिती लपवली तर थेट कारवाई

- प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, गावात अनधिकृत पुतळा, स्मारक किंवा ध्वजस्तंभ उभारला जात असल्यास संबंधित यंत्रणांना तात्काळ माहिती देणे बंधनकारक आहे.
- पोलिस पाटील यांनी पोलिस व महसूल विभागाला माहिती देणे आवश्यक
- ग्रामसेवकांनी गटविकास अधिकाऱ्यांना कळवणे बंधनकारक
- तलाठ्यांनी तहसीलदारांना माहिती देणे आवश्यक
- या प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई किंवा माहिती दडपल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.



### नव्याने पुतळा उभारण्यासाठी या गोष्टी गरजेच्या

1. अर्ज (नियमानुसार नमुन्यात)
2. जागेच्या मालकी हक्काचे प्रमाणपत्र/ ना हरकत प्रमाणपत्र (NOC)
3. ग्रामपंचायत/नगरपरिषद ठराव तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी/मुख्याधिकारी यांचा अभिप्राय
4. पोलिस विभागाचा अहवाल (कायदा व सुव्यवस्था बाबत)
5. सार्वजनिक बांधकाम विभाग/संबंधित प्राधिकरणाची परवानगी
6. पुतळ्याचा आराखडा व मोजमाप, कला संचानालय पत्र, मुख्यवास्तुशास्त्रज्ञ यांचे नाहरकत प्रमाणपत्र
7. देखभाल जबाबदारीचा स्थानिक प्राधिकरणासोबतचा लेखी करार व इतर प्रतिज्ञापत्र
8. जिल्हास्तरीय पुतळा समितीची अंतिम मंजुरी
9. ज्या ठिकाणी पुतळा उभा राहायचा आहे, तेथील स्थानिक नागरिकांचा अहवाल ग्रामसभा घेवून प्राप्त करून घ्यावा.

### ग्रामपंचायत सदस्यांवर अपात्रतेची तलवार

अनधिकृत पुतळ्यांची माहिती पोलिस प्रशासनाला न दिल्यास संबंधित गावचे सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांवर थेट अपात्रतेची कारवाई होणार आहे. यासाठी गटविकास अधिकाऱ्यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून अंतिम निर्णय जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून घेतला जाणार आहे.

### ग्रामसेवक, तलाठीही जबाबदार

या प्रकरणात केवळ लोकप्रतिनिधीच नव्हे तर प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरण्यात आले आहे. ग्रामसेवक आणि तलाठ्यांनी कर्तव्यात हलगर्जीपणा केल्यास संबंधित गटविकास अधिकारी व तहसीलदारांकडून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.

### कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर

गेल्या काही काळात विविध महापुरुषांचे अनधिकृत पुतळे सार्वजनिक ठिकाणी उभारण्याच्या घटना वाढल्या असून, त्यामुळे सामाजिक तणाव आणि जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

### नियमावलीची कडक अंमलबजावणी

जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, पुतळे उभारण्यासाठी आवश्यक परवानग्या, नियमानुसार प्रक्रिया आणि संबंधित विभागांची मंजुरी घेणे अनिवार्य आहे. नियम मोडून केलेल्या कोणत्याही उभारणीवर तात्काळ कारवाई केली जाईल.

### संदेश स्पष्टः नियम मोडाल, तर पदही जाईल!

सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत यंत्रणांमध्ये खळबळ उडाली असून, येत्या काळात अनधिकृत पुतळ्यांवर पूर्णपणे आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### अनधिकृत पुतळे काढण्याच्या मार्गदर्शक सूचना

१) अनधिकृतपणे पुतळा, स्मारकं व ध्वजस्तंभ उभारल्याची माहिती मिळताच संबंधित उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस ठाण्याचे अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांनी संबंधितांशी चर्चा करून चार तासांच्या आत पुतळा काढण्याची कार्यवाही करावी.

२) जागेची मालकी न पाहता प्रकरणी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी पुढाकार घेऊन तहसीलदार, गटविकास अधिकारी अणि इतर विभागांच्या समन्वयाने पुतळा हटविण्याची कार्यवाही करावी.

३) ज्या व्यक्ती किंवा समूह अनाधिकृत पुतळा, स्मारके व ध्वजस्तंभ उभारतील, त्याच्या माहितीसाठी व्हिडीओ शुटिंग आणि ड्रोन कॅमेऱ्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थेने निगराणी करावी. जबाबदार व्यक्तीच्या विरोधात २४ तासांत गुन्हे दाखल करावेत.

४) अनधिकृत पुतळा, स्मारक व ध्वजस्तंभ हटविण्यासाठी पोलिस, महसूल व ग्रामविकास विभाग यांनी संयुक्त बैठक घेऊन कारवाई करावी.

५) अनधिकृत पुतळे निर्मितीचे कारखाने बंद करण्यात यावेत. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय पुतळा सुपूर्त न करण्याचे बंधपत्र कारखानदारांकडून घेतले जाणार आहेत.

६) हटविलेले पुतळे जवळच्या शासकीय गोदामात सुरक्षित ठेवण्यात येतील.

७) गावांमध्ये अनधिकृत उभारणीची शक्यता असल्यास प्रशासनाने पूर्वबैठक घेऊन नागरिकांना परावृत्त करावे. आदेशाला विरोध करणाऱ्यांविरुद्ध कारावास व दंडाची तरतूद करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी व पोलिस अधिकाऱ्यांनी दरमहा १० तारखेपूर्वी कारवाईचा अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

### वात्रटिका

**संप्रदायीक वार**

झेपत नसतानाही आता
या वयात घेतला भार...
नको ते ओढावून घेतले
नि संप्रदायावर केला वार...
वार करून त्यांनी तर
टक्केवारी सुद्धा काढली...
समजून न घेताच तुषार
सिंचनाने लगेच दृष्ट काढली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566



## संपादकीय

# सार्वजनिक आरोग्यसेवेचे दुखणे

एका शेतकरी कुटुंबातील कर्त्या व्यक्तीला उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचे निदान झाले. सुरुवातीला त्यांच्याकडे असलेल्या बचतीतून खासगी दवाखान्यात तपासण्या केल्या. उपचारांसाठी सरकारी दवाखान्यातून औषधे घेतली; पण ती कधी मिळायची, कधी नाही. म्हणून मग ते खासगी दुकानातून औषधे घेऊ लागले. पण खर्च वाढू लागला. बचतीचे पैसे संपले. महिला बचत गटातून कर्ज काढून उपचार सुरू ठेवले; पण तपासणी, डॉक्टरांची फी, औषधांचा महिन्याला दोन-अडीच हजाराचा खर्च परवडेना. मग नाईलाजाने उपचार मध्येच थांबवले.

देशातील सर्वात प्रगत, अर्थसंपन्न, सर्वाधिक आर्थिक योगदान देणारे, वैद्यकीय तंत्रज्ञानात प्रगत अशी अनेक बिरूदे आपण महाराष्ट्रासाठी मिरवत आहोत. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी व आरोग्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात 'मेडिकल टुरिझम' विकसित करणार असल्याचे घोषित केले. अर्थात हा विचार म्हणून चांगलाच आहे. इतर देशांच्या तुलनेत आपले राज्य याबाबतीत पुढे आहे, हे यातून स्पष्ट होते; पण आपल्या राज्यातील जनतेला प्राथमिक उपचारासाठी कर्जबाजारी व्हावे लागणे, साध्या-साध्या उपचारांसाठी या दवाखान्यातून त्या दवाखान्यात खेटा घालायला लागणे किंवा सरकारी दवाखान्यातून उपचार न मिळता नाईलाजास्तव भरमसाठ पैसा मोजून खासगी रुग्णालयातून उपचार घ्यावे लागणे, हे योग्य नाही.

महाराष्ट्राने आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची प्रगती साधल्याबाबतचे आकडे नेहमीच सांगितले जातात. राज्यात संस्थात्मक प्रसूती वाढल्या, माता आणि बाल मृत्युदर कमी झाला, हे काही अंशी वास्तव असले, तरी वास्तवाची दुसरी बाजूही नाकारता येणार नाही. काही ठिकाणी अजूनही घरी प्रसूती होतात आणि 'टार्गेट' पूर्ण करण्यासाठी 'संस्थात्मक'प्रसूती म्हणून दाखविल्या जातात. कुपोषण, ॲनिमिया आणि असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत असताना, आरोग्य व्यवस्था ही केवळ प्रसूतीच्या सेवा देण्यासाठीच मर्यादित आहे का, असा प्रश्न पडतो.

सार्वजनिक आरोग्य यंत्रणेचा मुख्य उद्देश प्रतिबंधात्मक पातळीवर उपाययोजना करणे आहे. या स्तरावर चांगले काम असेल तरच अधिकाधिक लोकांना त्याचा फायदा मिळेल. साधारण ७० टक्क्यांपेक्षा अधिक जनतेला प्राथमिक सेवांचीच गरज असल्याची असून, मर्यादित लोकसंख्येला मोठ्या आजारांवरील उपचारांची आवश्यकता आहे; पण प्रत्यक्ष आजार वाढल्यावर उपचार करू, असे उलट धोरण राबवले जात आहे.

आज अनेक महत्त्वाच्या सेवांचे सार्वजनिक-खासगी भागीदारीतून खासगीकरण केले आहे. त्यामुळे आधी मोफत मिळणाऱ्या सेवांसाठी आता पैसे मोजावे लागत आहेत. उदा. गरोदरपणाच्या कालावधीत किमान दोन सोनोग्राफी व ॲनॉमली स्कॅन केले जाते. यासाठी साधारण अडीच-तीन हजारांचा खर्च होतो. पण ही सोनोग्राफी खासगी केंद्रांतून करून त्यांना शासनाकडून ८०० - १००० रुपये रक्कम दिली जाते. उर्वरित खर्च त्या कुटुंबावर पडतो. स्त्रीरोग तज्ज्ञ नाही म्हणून खासगीत उपचार, लॅब व तपासण्या बाहेरून, पुरेशी औषधे मिळत नाहीत म्हणून ती बाहेरून; मग कोणत्या सेवा मोफत मिळाल्या? राज्यात एका वर्षात साधारण चार लाख २५ हजारपेक्षा अधिक गरोदर मातांची नोंदणी होते. यासाठी फक्त सोनोग्राफीसाठी साधारण १०६ कोटी २५ लाख एवढा खर्च वर्षाला खासगीत जातो. वास्तविक हाच निधी वापरून प्रत्येक तालुक्यात एक सोनोग्राफी सेंटर सुरू करणे शक्य आहे. तसे झाल्यास रुग्णांवरील अतिरिक्त खर्चाचा ताण कमी होईल. सोबतच, सरकारी आरोग्य यंत्रणेच्या बळकटीसही त्यामुळे सहाय्य होईल.

अशीच स्थिती सार्वजनिक-खासगी भागीदारीतून चालवल्या जाणाऱ्या लॅबचेही आहे. यातूनही रुग्णांची लूटच होत आहे. राज्यात उच्च रक्तदाब, मधुमेहासारख्या असंसर्गजन्य आजारांचे वाढते प्रमाण मोठे आव्हान ठरत आहे. या आजारांवर दीर्घकालीन किंवा कायमस्वरूपी उपचारांची आवश्यकता असते. उच्च रक्तदाब किंवा मधुमेहाच्या एका रुग्णाला उपचारासाठी महिन्याला सरासरी १२०० ते १५०० रुपये खर्च येतो. सरकारी दवाखान्यात असंसर्गजन्य आजारांची पुरेशी औषधे उपलब्ध नसल्याने रुग्णांना ती नियमित मिळतीलच, याची खात्री नाही. त्यामुळे लोक सरकारी आरोग्य व्यवस्थेपासून दूर जात आहेत. तशा स्थितीत विविध आरोग्य तपासण्या, विविध उपचार यांसाठी त्यांना खासगी व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत आहे.

सद्यस्थितीत सरकारी आरोग्य व्यवस्थेत अनेक पातळ्यांवर कमतरता दिसून येते. डॉक्टर, परिचारिका, समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळावर आरोग्य यंत्रणा चालवण्याचा ताण येतो. वारंवार उद्भवणारा औषधांचा तुटवडा आणि इतर संसाधनांची कमतरता मोठ्या प्रमाणावर दिसते. यासोबतच लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात आरोग्य सुविधांची वाढ, सुधारणा होत नाही. परिणामी, ठरावीकच रुग्णालयांवर रुग्णसंख्येचा ताण वाढतो. तसेच ग्रामीण भागात आरोग्यकेंद्रे गावांपासून लांब असल्यामुळे लोक त्या ठिकाणी जाण्याचे टाळतात व खासगीकडे वळतात. सरकारी आरोग्य व्यवस्था अशी कमकुवत असल्यामुळे, खासगी व्यवस्थेला पसरायला आणखी वाव मिळतो.

खासगी आरोग्यसेवा ही जनतेची 'निवड' नसून 'अपरिहार्यता' झाली आहे. खासगी रुग्णालयांमध्ये सेवा तत्काळ मिळत असल्या, तरी दरनियंत्रणाचा अभाव, अनावश्यक तपासण्या आणि महागड्या औषधांमुळे तेथे अतिरिक्त खर्च होतो. परिणामी, बचत खर्चून, कर्ज घेवून किंवा इतर मुलभूत गरजा कमी करून हे उपचार घ्यावे लागतात. मोठ्या उपचारांसाठी 'महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य'सारखी विमा योजना राबवली जात असली, तरी या योजनेत मुख्यतः रुग्णालयातील उपचार येतात. प्रत्यक्षात जास्त खर्च हा बाह्यरुग्ण सेवा, औषधे आणि तपासण्यांवर होतो. ते विम्याच्या कक्षेत येत नसल्याने, विमा असूनही लोकांचा आर्थिक भार कमी होत नाही. अशा अनियंत्रित व्यवस्थेचा परिणाम म्हणून भारतात दरवर्षी आरोग्य खर्चामुळे सुमारे पाच ते सहा कोटी, तर महाराष्ट्रात दरवर्षी ४० ते ६० लाख लोक गरिबीत ढकलले जात असल्याचे विविध अभ्यासातून समोर आले आहे. राज्यात आजही एकूण आरोग्य खर्चाच्या ४० ते ५५ टक्के रक्कम रुग्णाला स्वतःच्या खिशातून भरावी लागते. म्हणूनच आरोग्य सेवांवरील रुग्णाच्या खिशातून होणाऱ्या खचार्चे प्रमाण वाढत आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे.

महाराष्ट्राने आरोग्य क्षेत्रात प्रगती साधली असली, तरी ती सर्वांसाठी समान नाही. राज्यात आरोग्य सेवांची 'असमानता' हे सर्वात मोठे आव्हान आहे. शहरात आधुनिक आरोग्य सुविधा सहज उपलब्ध आहेत, तर ग्रामीण आणि आदिवासी भागात मूलभूत सेवाही अपुऱ्या आहेत. परिणामी, स्थलांतरित कामगार, गरीब कुटुंबांना आरोग्य सेवांचा लाभ कमी प्रमाणात मिळतो. त्यामुळे 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना अजूनही अपूर्ण आहे.

राज्यात 'सर्वांना समान आरोग्य सेवा ' मिळावी, यासाठी प्राथमिक आरोग्य सेवांचे सक्षमीकरण अत्यावश्यक आहे. प्रतिबंधात्मक सेवांवर भर देणे, सार्वजनिक आरोग्यावरील खर्च केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्षात वाढवणे गरजेचे आहे. यासोबतच परवडणाऱ्या आरोग्य सेवांसाठी खासगी आरोग्य क्षेत्राचे नियमनही आवश्यक आहे. एकूणच हा प्रश्न केवळ आरोग्य व्यवस्थेचा नाही; तर सरकारच्या प्राधान्यक्रमांचा आहे. हे प्राधान्यक्रम नीट लावले तरच 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकेल, हे सगळ्यांनीच लक्षात ठेवायला हवे.

# सामाजिक क्रांतीचे दीपस्तंभ : महात्मा ज्योतिराव फुले

भारताच्या सामाजिक इतिहासात ११ एप्रिल हा दिवस केवळ एका महापुरुषाच्या जन्माचा दिवस नाही, तर समता, शिक्षण आणि मानवतेच्या नव्या युगाची सुरूवात करणारा दिवस आहे. महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांच्या जन्मामुळे भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. सन १८२७ मध्ये जन्मलेल्या या युगपुरुषाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाच्या प्रत्येक स्तरावर जाणवतो. ११ एप्रिल पासून महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात द्विशताब्दी जयंती समिती स्थापन केली आहे. समाजातील समता, शिक्षण, स्त्री-सक्षमीकरणांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य सरकारने संकल्प केला आहे. त्यामुळे ११ एप्रिलचा दिवस भारताच्या सामाजिक समतेच्या तेजस्वी द्विशताब्दी पवार्चा दिवस म्हणूनही देशात साजरा होत आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचा पुनर्विचार करणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून वर्तमानाला दिशा देण्याचे कार्य आहे.

मानवतेचा धर्म : समतेचा मूलाधार

महात्मा फुले यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू म्हणजे 'मानव हा सर्वात मोठा धर्म आहेह्व ही भूमिका. त्यांनी धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीचा विचार मांडला. त्यांच्या लेखनात आणि कृतीतून सतत दिसून येते की, समाजातील अन्याय आणि विषमता दूर केल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ तात्त्विक नव्हती, तर ती प्रत्यक्ष कृतीतून **साकारलेली होती.**



### शिक्षणाची ज्योत : अज्ञानातून मुक्तीचा मार्ग

महात्मा फुले यांनी घेतलेला सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे शिक्षणाचा प्रसार. त्यांनी प्रथम स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले आणि त्यानंतर १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाईंनीही समाजाच्या विरोधाला न जुमानता स्वतःला शिक्षणासाठी वाहून घेतले. शेण गोट्याचा मार सहन करत सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. जोतीबा आणि सावित्री या दांपत्याच्या त्या काळातील सामाजिक बंडामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली.त्या काळात स्त्रीशिक्षणाला तीव्र विरोध असतानाही त्यांनी मागे हटणे स्वीकारले नाही. शिक्षण हेच शोषणाविरुद्धचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे, ही त्यांची धारणा होती. या कार्यातून त्यांनी समाजातील अज्ञानाची बेडी तोडण्याचा प्रयत्न केला.अविद्या हेच शोषणाचे मुख्य कारण आहे हे सांगताना त्यांनी समाजाला याबाबतचा कठोर संदेश दिला–

'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नितीविना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले'–

अन्यायाविरुद्ध बंड त्या काळातील समाज रुढी-परंपरांच्या कठोर बंधनात अडकलेला होता. बालविवाह, सतीप्रथा, स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता यांसारख्या प्रथांनी समाजाला जखडून ठेवले होते. महात्मा फुले यांनी या सर्व प्रथांविरुद्ध उघडपणे आवाज उठवला. त्यांनी विधवांसाठी आश्रयस्थळे उभारली, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कृतीतून समाजातील महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.

सत्यशोधकांचा मार्ग : समतेची संघटित चळवळ

सन १८७३ मध्ये त्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा भारतीय सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जातीभेद,अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध संघटित लढा उभारला. सत्यशोधक समाजाने समाजाला विचार करण्याची नवी दिशा दिली. ज्यामध्ये सत्य, समता आणि बंधुता यांना केंद्रस्थानी ठेवले आहे. सत्यशोधक समाजाच्या मार्फत त्यांनी एक समांतर विज्ञानवादी भूमिका समाजापुढे मांडली.तत्कालीन ब्राह्मण्यवादाला झुगारून नव्या चालीरीती समाजाला दिल्या.

### शेतकऱ्यांचा आवाज : अन्यायाविरुद्धचा प्रहार

महात्मा फुले यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर आर्थिक विषमतेवरही भाष्य केले.त्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे अत्यंत वास्तव चित्रण केले आहे. महसूल व्यवस्थेतील अन्याय, सावकारशाहीचे शोषण आणि प्रशासनातील दुर्लक्ष यावर त्यांनी कठोर टीका केली. शेतकरी हा समाजाचा कणा असूनही त्याचे जीवन दारिद्र्यात का अडकले आहे, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला.

### विचारांची शस्त्रे: लेखनातून घडवलेले परिवर्तन

महात्मा फुले हे केवळ कृतीशील समाजसुधारक नव्हते, तर प्रभावी लेखकही होते. 'गुलामगिरी' या ग्रंथातून त्यांनी जातीव्यवस्थेवर प्रखर प्रहार केला, तर 'सार्वजनिक सत्यधर्म' मधून मानवतावादी धर्माची संकल्पना मांडली. त्यांच्या लेखनातून समाजाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे कार्य झाले. यातून त्यांच्या विचारांची व्यापकता स्पष्ट होते.याशिवाय त्यांनी गुलामगिरी,शेतकऱ्यांचा आसूड,ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न,सार्वजनिक सत्य धर्म,छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा लिहून शिवरायांच्या कार्यकर्तुत्वाची ओळख करून दिली.रायगडावरील छत्रपती शिवरायांच्या समाधीची स्वच्छता केली. शिवाजी महाराजांच्या स्मृती पुनरुज्जीवनाच्या प्रारंभीच्या प्रयत्नांपैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व त्यांना मानले जाते.

### सार्वजनिक जीवनातील योगदान

महात्मा फुले यांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय सहभाग घेतला. पुणे महानगरपालिकेच्या कायार्तून त्यांनी नागरी प्रश्नांवर काम केले. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांनी ब्रिटिश प्रशासनाशी संवाद साधून सामाजिक प्रश्न मांडले आणि वंचित घटकांसाठी न्यायाची मागणी केली. शासन कोणतेही असो, ते न्याय्य आणि लोकहितकारी असले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. हंटर शिक्षण आयोगाकडे त्यांनी निवेदन सादर केले. सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला.

### सामाजिक सुधारणा स्वीकारल्या

इंग्रजांच्या काही सामाजिक सुधारणांना स्वीकारताना त्यांनी इंग्रजांच्या अन्यायकारक नीतीवर सडकून टीका केली. एवढेच काय इंग्रजांना समजेल अशा भाषेत त्यांनी त्याची उत्तरे दिली. कोणताही पहिला प्रयोग स्वतःच्या घरी, स्वतःच्या कुटुंबावर करून ह्यबोले तैसा चाले ,त्याची वंदावी पाऊलेह्व, असा आदर्श त्यांनी समाजामध्ये निर्माण केला आहे. स्वतःच्या पत्नीला शिकवले. स्वतःची विहिर मागास वर्गीयांसाठी खुली केली. ब्राह्मण्यवादाचा आयुष्यभर विरोध करुनही त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला.त्या मुलाचे आंतरजातीय लग्न लावून देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. महात्मा जोतीबा फुले यांनी घेतलेले निर्णय अशा प्रकारे कायम प्रेरणादायी आहेत. महात्मा ज्योतिबा फुले हे स्वतःच्या मुलाचा आंतरजातीय विवाह करणारे पहिले पालक ठरले आहेत. काळाची पावले ओळखून नवनव्या प्रयोगाद्वारे सामाजिक सुधारणा करण्यात भारतातल्या सर्व सामाजिक सुधारणा करणाऱ्या थोर पुरुषांमध्ये त्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले वेगळे ठरले आहेत.

### यशस्वी व्यावसायिक

सामाजिक कार्य, संघटना सुरु ठेवण्यासाठी आर्थिक स्त्रोत मजबूत असणे आवश्यक असते. त्यासाठी अंगी व्यावसायिक कसब बाळगणे खूप गरजेचे असते. संघटना, चळवळी, सुधारणांचा डोलारा चालविण्यासाठी पैशाची गरज असते. त्यासाठी आदर्श पद्धतीने व्यवसाय करुन स्वयंपूर्ण होणे गरजेचे असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सोदाहरणासह मांडून ठेवले. त्यांनी कंत्राटदार म्हणून अतिशय उत्तमपणे काम केले. आजही त्यांच्या सहभागात तयार झालेल्या वास्तू प्रेरक आहेत. पूल, धरणे, कालवे या बांधकामात कंत्राटदार म्हणून त्यांनी काम केले.

### आजच्या काळातील विचारांची प्रासंगिकता

महात्मा फुले यांच्या कायार्ला दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही तितकीच आहे. शिक्षणातील विषमता, सामाजिक भेदभाव आणि स्त्रीसमानतेचे प्रश्न अद्यापही पूर्णतः संपलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार आणि आचरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या कायार्चा अभ्यास केल्यास समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असलेली दृष्टी मिळते.

### ज्योतिराव परिवर्तनाची अखंड प्रेरणा

महात्मा ज्योतिराव फुले हे एक व्यक्तिमत्त्व नसून एक चळवळ, एक विचारधारा आणि एक प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या कायार्तून राजर्षि छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रेरणा घेतली.त्यांच्या कायार्मुळेच महाराष्ट्राला फुलेह्नशाह-आंबेडकरांचा महाराष्ट्र ही ओळख प्राप्त झाली आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करणे म्हणजे केवळ आदर व्यक्त करणे नव्हे, तर त्या मूल्यांना आपल्या जीवनात रुजवण्याचा संकल्प करणे होय.

महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात विशेष समिती स्थापन केली असून वर्षभर महात्मा जोतीराव फुले यांच्या जीवनकायार्ला साजेशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरणार आहे.

# रे नगर गृहप्रकल्पातील वीज जोडणीचा प्रश्न मार्गी
# खंडित वीजपुरवठा तात्काळ सुरू करण्याची मागणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मौजे कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर) येथील रे नगर फेडरेशनच्या वतीने उभारण्यात आलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३० हजार सदनिकांच्या गृहप्रकल्पात सध्या १५,००४ घरे पूर्ण झाली असून अनेक लाभार्थी वास्तव्यास गेले आहेत.

या प्रकल्पातील लाभार्थ्यांना नवीन वीज जोडणी नाममात्र ५०० रुपयांत देण्याबाबत महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांकडून ६ नोव्हेंबर २०२३ रोजी कार्यालयीन आदेश जारी करण्यात आला होता. त्यानुसार प्रति जोडणी प्रक्रिया शुल्क १२० रुपये, त्यावर १८



टक्के जीएसटी आणि ३८० रुपये सुरक्षा ठेव अशी एकूण ५०० रुपयांची रक्कम निश्चित करण्यात आली होती.

मात्र, अनावधानाने वीज वितरण कंपनीकडून वाढीव दराने वीज जोडणीची मागणी केली जात असल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात शिष्टमंडळाने संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. त्यानंतर लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच ५०० रुपयांत नवीन वीज जोडणी देण्यात येईल, अशी स्पष्ट हमी देण्यात आली.दरम्यान, रे नगर गृहनिर्माण प्रकल्पातील गट क्रमांक ७६४, ७५५, ७२१, ७२२-२३, ७२६, ६९७ व ७०७ मधील लाभार्थ्यांना घरे हस्तांतरित करण्यात आली आहेत. मात्र, या भागातील वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सदर वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

वीजपुरवठा खंडित राहिल्यामुळे या महत्वाकांक्षी व पथदर्शी रे नगर गृहप्रकल्पात लाभार्थी वास्तव्यास येण्यास टाळाटाळ करत असून, त्याचा प्रतिकूल परिणाम प्रकल्पावर होत आहे. त्यामुळे नागरिकांना अत्यावश्यक सेवा तातडीने उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे मत प्रकल्पाचे मुख्य प्रवर्तक कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी व्यक्त केले.

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ रोजी रे नगर गृहनिर्माण प्रकल्पाच्या वतीने ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांना निवेदन सादर करण्यात आले.या वेळी शिष्टमंडळात कॉ. युसुफ शेख (मेजर), दाऊद शेख, नरेश दुगाणे, वीरेंद्र पद्मा, पांडुरंग म्हेत्रे आदींचा समावेश होता.

# 'गोंधळ'चे दिग्दर्शक संतोष डावखर सर्पमित्राच्या भूमिकेत

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित 'गोंधळ' चित्रपटाचे दिग्दर्शक संतोष डावखर सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आले आहेत. त्यांनी त्यांच्या सोशल मीडियावर साधारण दहा वर्षांपूवीर्चा एक व्हिडिओ शेअर केला असून, त्यामध्ये ते सापांचे रेस्क्यू करताना दिसत आहेत. पडद्यामागे कथा घडवणारा दिग्दर्शक प्रत्यक्ष आयुष्यात सर्पमित्र म्हणून कार्यरत असल्याचे पाहून नेटकऱ्यांमध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल नवी उत्सुकता निर्माण झाली आहे.

दहा वर्षांपूर्वीच्या या व्हिडिओमध्ये संतोष डावखर अत्यंत शांतपणे आणि कौशल्याने साप हाताळताना दिसतात. कोणतीही घाईगडबड किंवा भीती न दाखवता, सापाला कोणतीही इजा होणार नाही याची पूर्ण काळजी घेत ते त्याला



सुरक्षितपणे पकडतात. त्यांच्या या कायांच सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.

संतोष डावखर हे डोंबिवलीस्थित 'नेचर सेव्ह सोसायटी' या कल्याण डोंबिवली मधील संस्थेशी जोडलेले असून, सचिन जोशी या संस्थेचे अध्यक्ष आहेत. सापांबद्दलची भीती दूर करण्यासाठी आणि निसर्ग संवर्धनासाठी ते सक्रियपणे कार्यरत आहेत.

२०१५ पर्यंत या टीमने केडीएमसी परिसरातून अधिकृतरीत्या ८५०० हून अधिक सापांचे पुनर्वसन येऊर नॅशनल पार्क, मानकोली फॉरेस्ट, कनार्ळा अभयारण्य आणि बोरीवली नॅशनल पार्क परिसरात केले आहे. अनेकदा वन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तसेच शाळा-कॉलेजमधील विद्यार्थ्यांसमोर प्रात्यक्षिके घेतली जातात. विद्यार्थ्यांना सापांविषयी योग्य माहिती, प्रथमोपचाराची माहिती आणि पर्यावरणातील त्यांचे महत्त्व याबद्दल जागरूक केले जाते.

याबद्दल संतोष डावखर यांच्या मते , " भारतात जन्मलेल्या प्रत्येक सजीवाला, मग तो माणूस असो, प्राणी असो किंवा अगदी सूक्ष्म जीव. या सर्वांचा निसर्गसंपत्तीवर तितकाच हक्क आहे. प्रत्येकाला या भूमीवर जगण्याचा अधिकार आहे. साप हा अन्नसाखळीतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जर ही साखळी कोलमडली, तर त्याचे दूरगामी परिणाम पर्यावरणावर होऊ शकतात. त्यामुळे अन्नसाखळीतील महत्वाचा घटक साप आणि असेच निगडित असलेले सर्व जीव वाचवणे अत्यंत आवश्यक आहे.

लोक सापाला फक्त धोक्याच्या दृष्टीने पाहातात, पण प्रत्यक्षात साप आपल्यावर हल्ला करायला पुढे येत नाहीत. आपण भीतीपोटी चुकीच्या प्रतिक्रिया देतो. योग्य पद्धतीने हाताळलं, तर सापांनाही वाचवता येतं आणि माणसांनाही सुरक्षित ठेवता येतं. त्यामुळे साप दिसल्यास घाबरण्यापेक्षा सर्पमित्रांना बोलावणं आणि त्याला सुरक्षित ठिकाणी सोडणं हेच योग्य आहे. आमच्या संस्थेमार्फत शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सापांविषयी जागरूक केलं जातं. त्यासाठी नेचर सेव्ह सोसायटी शाळेत जाऊन, साप आणि त्यांचे निसगार्तील महत्व याबद्दलची संपूर्ण माहिती देते. साप विषारी, बिन विषारी कसा ओळखावा.

साप चावल्यास प्रथमोपचार कसा करावा, साप ओळखण्याची प्राथमिक माहिती आणि पर्यावरणातील त्यांचं स्थान याबद्दल मार्गदर्शन केलं जातं.

विद्यार्थ्यांना बिन विषारी साप हातात हाताळण्यास देणे, तसेच या माध्यमातून भीती व अंधश्रद्धे ऐवजी जागरूकता निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न असतो.

" मात्र माहिती नसताना साप कोणीही हाताळू नये कारण बरेच सर्पमित्र साप पकडताना अपघाताने सर्पदंश होऊन ॲन्टिव्हेनम न मिळाल्यामुळे जीवाला मुकले आहेत. जर सर्पदंश झालाच, तो विषारी असो वा बिन विषारी त्वरीत जवळच्या सरकारी रुग्णालयात धाव घ्या. कारण हे ॲन्टिव्हेनम केवळ सरकारी रुग्णालयातच उपलब्ध असतात. बाहेर ते महाग असतात. त्यामुळे नेहमीच काळजी घ्यावी, असे आवाहनही संतोष डावखर करतात.

या व्हिडिओमुळे संतोष डावखर यांची एक वेगळीच ओळख समोर आली आहे. चित्रपटांच्या माध्यमातून कथा सांगणारे दिग्दर्शक प्रत्यक्ष आयुष्यात मात्र निसगार्शी जोडलेली खरी गोष्ट जगताना दिसत आहेत. त्यांच्या या अनोख्या कार्यामुळे 'गोंधळ'चे दिग्दर्शक आता सोशल मीडियावर 'रिअल लाइफ हिरो' म्हणून चर्चेत आले आहेत.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अधिक सुरक्षित, पारदर्शक शालेय वाहतुकीसाठी राज्य शासन कटिबद्ध : मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने शालेय बस व वाहतूक व्यवस्थेबाबत कठोर आणि सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६' लागू करण्याचा प्रस्ताव असून, यात सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. या बाबतीत अधिसूचना जाहीर झालेल्या दिनांकापासून पंधरा दिवस या विहित वेळेत संबंधित संकेतस्थळावर सर्व सामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्याला योग्य प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

**भाडे नियंत्रणावर स्पष्ट नियम**

नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाईल. विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले जाईल. एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

**पालकांच्या तक्रारींवर त्वरित तोडगा**

प्रत्येक शाळेत स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी कार्यरत राहणार असून भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी ती कमिटी पालकांच्या तक्रारींचे निवारण करेल. तसेच तिमाही अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान अनिवार्य**

सर्व शालेय बस व व्हॅनमध्ये GPS-आधारित Vehicle Location Tracking Device (VLTD) व पॅनिक बटण बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय अग्निसुरक्षा यंत्रणा (FDAS), CCTV प्रणाली, तसेच



सर्व सीट्ससाठी सीट बेल्टची सक्ती केली आहे.

**डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली लागू**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे. राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मशी या प्रणालीचे एकत्रीकरणही करण्यात येणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या देखरेखीवर विशेष भर**

प्रत्येक विद्यार्थ्याची चढ–उतार वेळेसह दैनिक उपस्थिती नोंदवणे बंधनकारक असेल. विशेषतः पूर्व–प्राथमिक आणि प्राथमिक (इयत्ता ५ वीपर्यंत) विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक प्रवासात महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे आवश्यक राहील.

**अपंग व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा**

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षित कर्मचारी, सुलभ प्रवेश व्यवस्था आणि आवश्यक तेव्हा पालक/शिक्षक उपस्थितीची तरतूद करण्यात आली आहे.

**कर्मचाऱ्यांची काटेकोर पडताळणी**

बस चालक, वाहक व इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व नोंदी तपासणीसाठी उपलब्ध ठेवणे बंधनकारक असेल.

**नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई**

नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**संयुक्त तपासणी यंत्रणा**

शालेय वाहतुकीची नियमित तपासणी शिक्षण व परिवहन विभाग संयुक्तपणे करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील.

या सुधारित नियमांमुळे शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि तंत्रज्ञानाधारित होणार असून, पालक आणि विद्यार्थ्यांचा विश्वास अधिक दृढ होणार असल्याची भावना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली आहे.

# महर्षी वाल्मिकी संघाचे अनोखे आंदोलन

## ठेकेदाराच्या डोक्यावर मंत्र्याचा वरदहस्त

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** "मंत्र्यांचे दौरे असल्यावर, आठ एकादशी व चार यात्रा कालावधीतच मी चालू असते किंवा बिल काढण्याच्या दोन दिवस अगोदरच मी सुरू असते, इतरवेळी मात्र मी कायम बंदच असते त्यामुळे साहेब माझ्या चंद्रभागा जलशुद्धीकरणाचे कामाचे बील काढू नका, कारण आम्ही चंद्रभागेचे पाणी शुध्द केलेले नाही." अशा आशयाचा डिजीटल फलक चंद्रभागेच्या पात्रात जलशुद्धीकरणासाठी उभारण्यात आलेल्या सेबर टेक्नॉलॉजी च्या मशिनरीवर लावण्यात आलाय.



पंढरपुर मधील महर्षी वाल्मिकी संघाचे वतीने हे अनोखं आंदोलन सुरू केले आहे. आजपर्यंत या मशिनरी बसवलेल्या ठेकेदाराचे साडे पाच कोटी बिल शासनाने अदा केलेय, एकुण २४ ते अठ्ठावीस कोटींचे आणखी बील संबंधित ठेकेदार शासनाकडून उधळणार आहे, या ठेकेदारावर एका मंत्र्याचा वरदहस्त असल्याने भक्त पुंडलिकरायाच्या समोरंच पवित्र चंद्रभागेच्या पात्रात ही पत्र्याची बिनकामाची डबडी उभारून शासनाला कोट्यावधीचा गंडा घालण्याचं महापातक चंद्रभागेच्या जलशुद्धीकरणाचे नावाखाली केले जात आहे. हे आम्ही कदापीही खपवून घेणार नाही,.

संबंधित ठेकेदाराच्या व या मशिनरीच्या जलशुद्धीकरण कामाची शहानिशा केली तर फक्त एकादशी, यात्रा कालावधीत व मंत्री महोदयांचे दौरे असतात तेंव्हाच या मशिनरी सुरु केल्या जातात. इतरवेळी कायम बंद असतात, मग यासाठीचे कोट्यावधी रूपयांची बीलं शासनाने का द्यावी? असा खडा सवाल महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी उपस्थित केला आहे.

एकीकडं शासनाच्या तिजोरीत खडखडाट आहे, पंढरपूर नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती सुध्दा नाजूक आहे असे बोलले जाते, आणि त्यामुळे पंढरीतील कित्येक प्रश्न प्रलंबित आहेत. आणि इथं विठुरायाच्या समोरंच सेबर टेक्नॉलॉजी मशिनरीजच्या माध्यमातून कुंपनच शेत खातेय, कोट्यावधी रुपए खर्च करून पांढरा हत्ती पोसला जातोय, अरे कुठं फेडाल हे महापाप?

आमची बहिण चंद्रभागा, भाऊ भक्त पुंडलिकराया दुर्गंधीच्या साम्राज्यात, प्रदुषणाच्या विळख्यात कायमच असतात, हे विदारक चित्रं प्रत्यक्ष मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, खासदार, आमदारांनी येऊन बघावे. म्हणजे दुध का दुध आणि पाणी का पाणी होऊन जाईल. अशी उद्विग्न प्रतिक्रिया व्यक्त करत गणेश अंकुशराव व सहका-यांनी संबंधित मशिनरीजवर चढून जोरदार घोषणाबाजी केली आहे.

शासनाने जर यासंदर्भात तातडीने चौकशी लावुन कोट्यावधीचं घबाड घशात घालणा-या ठेकेदारावर व त्याला साथ देणा-या शासनातीलंच काही दलालांना कडक शासन केले नाही तर आम्ही स्वस्थ बसणार नाही, चंद्रभागेच्या पात्रात मोठे जनआंदोलन उभारून सबंध महाराष्ट्राचे लक्ष या भ्रष्टाचाराकडं वेधून घेऊ. आणि प्रसंगी सेबर टेक्नॉलॉजी च्या या मशिनरी भंगारात घालून टाकू, यावेळी जर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर याला सर्वस्वी प्रशासन व शासन जबाबदार राहील. असा इशाराही महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव व कार्यकर्त्यांनी दिलाय.

# उपराष्ट्रपतींची चैत्यभूमी भेटीला सकारात्मक प्रतिक्रिया; शिष्टमंडळाची सदिच्छा भेट



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** भारताचे उपराष्ट्रपती यांची महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष यांच्या शिष्टमंडळाने उपराष्ट्रपती भवन येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीत विविध सामाजिक व ऐतिहासिक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शिष्टमंडळाकडून १४ एप्रिल रोजी यांच्या जयंतीनिमित्त येथे उपस्थित राहण्याची विनंती उपराष्ट्रपतींना करण्यात आली. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत उपराष्ट्रपतींनी तत्काळ होकार दर्शवला.

यावेळी उपराष्ट्रपतींनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत असताना चैत्यभूमीला दिलेल्या भेटींच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच दादर येथे सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाबाबतही त्यांनी शिष्टमंडळाकडून माहिती घेतली. या स्मारकाच्या कामाला गती देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, बोधगया संदभार्तील प्रलंबित प्रश्नावरही शिष्टमंडळाने उपराष्ट्रपतींसोबत औपचारिक चर्चा केली. या चर्चेत विषयाच्या गांभीयार्ची जाणीव करून देण्यात आली. या प्रसंगी शिष्टमंडळाकडून उपराष्ट्रपतींना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या.

या भेटीत सुनील मगरे, सिद्धार्थ बनसोडे, नागसेन कांबळे, भदंत राहुल बोधी, बाळासाहेब करडक, आनंद चंदनशिवे, संजय अवसरमोल, शिल्पकार अनिल सुतार, सुबोध भारत, विजय अंभुरे आणि रामनाथ दवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'संगीत शिवस्वराज्यगाथा' प्रयोगाद्वारे 'स्वराज्य-एक दृष्टिकोन' सिंगापूरला पोहोचला

**सिंगापूर (वृत्त सेवा):-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित 'संगीत शिवस्वराज्यगाथा' ही सांगितिक प्रस्तुती आता पहिल्यांदाच भारताबाहेर जाऊन सिंगापूरमध्ये सादर होत आहे. ही केवळ एक कलाकृती नसून 'स्वराज्य- एक दृष्टिकोन'—म्हणजेच आत्मविश्वास, शिस्त आणि राष्ट्रासाठी सामूहिक जबाबदारी—हा विचार जगभर पोहोचवण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

हिंदू नववर्षाच्या निमित्ताने आयोजित 'चैत्र पालवी २०२६' या कार्यक्रमांतर्गत 'पूर्णवाद परिवार, सिंगापूर'तर्फे ही भव्य ऐतिहासिक संगीतमय प्रस्तुती आयोजित करण्यात येत आहे. मुंबईतील 'सईशा प्रॉडक्शन्स' निर्मित व प्रस्तुत हा विशेष उपक्रम ५ एप्रिल रोजी सायंकाळी ६:०० ते १०:०० या वेळेत सिंगापूरमधील kCSC@Tessensohn' येथे साकार होणार आहे.

'संगीत शिवस्वराज्यगाथा' हा कार्यक्रम संगीत, काव्य, निवेदन आणि दृश्यात्मक कथाकथन (visual storytelling) यांचा सुंदर मेळ साधत छत्रपती शिवाजी महाराजांचे संपूर्ण जीवन उलगडते. स्वराज्य स्थापनेतील महत्त्वाचे प्रसंग यात मांडले आहेत—जसे प्रतापगडाची लढाई, लाल महालावरचा धाडसी सर्जिकल स्ट्राईक, सुरत मोहीम तसेच यात परिचित अपरिचित योद्ध्यांबद्दल निवेदन आणि नवगीतांमधून माहिती अभ्यासू पद्धतीने मांडली जाते.

या प्रस्तुतीबद्दल बोलताना दिग्दर्शिका आणि निवेदिका पद्मश्री राव म्हणाल्या, हा कार्यक्रम केवळ इतिहास कथन नाही, तर इतिहास आपल्याला आज काय शिकवतो, हे समजून घेण्याचा प्रयत्न आहे. 'स्वराज्य एक दृष्टिकोन' हीच या सादरीकरणाची मुख्य ताकद आहे.'

या उपक्रमाचे लेखक, गीतकार आणि संगीतकार अनिल नलावडे म्हणतात, 'संगीत शिवस्वराज्यगाथा म्हणजे केवळ घटनांची मांडणी नाही, तर त्या मागच्या भावना आणि मूल्यांचा प्रखर अनुभव आहे. संगीत आणि कवितांद्वारे प्रेक्षकांना त्या काळाशी जोडण्याचा आमचा प्रयत्न आहे.'

या कार्यक्रमात नचिकेत देसाई, श्रीरंग भावे, केतकी भावे–जोशी आणि स्वतः अनिल नलावडे यांची संगीत सादरीकरणे अनुभवायला मिळणार आहेत. संकल्पना, गीत, संगीत आणि



पटकथा अनिल नलावडे यांची असून निवेदन आणि दिग्दर्शन पद्मश्री राव यांनी केले आहे.

या उपक्रमानिमित्त आणखी एक आकर्षण म्हणजे 'शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालन'. यामध्ये १५० निवडक चित्रकाव्यांचे दालन सिंगापूर येथे उभे करण्यात येत आहे. अनिल नलावडे यांच्या कवितांसोबत पद्मश्री राव यांनी तयार केलेल्या एआय–आधारित शिवचरित्राचा यात समावेश आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना शिवचरित्रातील प्रसंगानुरूप एक वेगळा अनुभव मिळेल.

हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य आहे, पण जागा मर्यादित असल्यामुळे पूर्व–नोंदणी आवश्यक आहे. विशेष म्हणजे या शिवसोहळ्यासाठी प्रेक्षकांनी पारंपरिक वेशभूषेत येण्याचे आवाहनही आयोजकां तर्फे करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सांगता भव्य 'शिवराज्याभिषेक सोहळ्या'ने होणार आहे, जो प्रत्येकाच्या मनात कायमचा ठसा उमटवेल.

एकूणच, 'संगीत शिवस्वराज्यगाथा' ही केवळ एक प्रस्तुती नसून—ती स्वराज्याचा विचार, संस्कृती आणि शिवचरित्रातील मूल्ये जगभर पोहोचवणारा असा एक सुंदर उपक्रम आहे.

**'सईशा प्रॉडक्शन्स', मुंबई विषयी**

'सईशा प्रॉडक्शन्स' ही संस्था गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि वारसा लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यरत आहे. 'संगीत शिवस्वराज्यगाथा'सारख्या कार्यक्रमांसोबतच 'शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालन' आणि ऐतिहासिक अभ्यासू सहली यांसारख्या उपक्रमांद्वारे ही संस्था विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजात सांस्कृतिक जागरूकता आणि मूल्याधारित शिक्षण पसरवत आह

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



आडवे शब्द : १) खा. राहुल गांधी यांचे मातपक्षामध्ये असलेले चुलतबंधू २) [illegible] असलेले पवारांचे नाव- *** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी माहिती न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू- ** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू- ** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरुद्धार्थी १९) पाकच्या एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) [illegible] विरुद्धार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) [illegible] २७) पाच उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) [illegible] ३४) [illegible] डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिद्ध पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची [illegible] ४४) रूप (हिंदीत)

उभे शब्द : १) [illegible] आरक्षणांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना- ****** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नवीन (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळावर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) [illegible] १२) भय, भीती (हिंदीत) १३) फुलांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) छत, टॅक्स २१) माहेरच्या विरुद्धार्थी २३) दुष्ट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्णय (हिंदीत) २९) एक लोकप्रसिद्ध [illegible] ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा मासिक मोबदला ३४) सलमान खानच्या भावाचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता- *** माने ३८) मनसे अध्यक्ष- ** ठाकरे ३९) दुःख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी बनवतात

## सुडोकु - 224

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ योजनेची व्याप्ती वाढवणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**सातारा (कटूसत्य वृत्त):-** ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांना खूप उपयोगी आहे. या योजनेची व्याप्ती राज्यात वाढवणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालय व नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोयना धरणातील गाळ काढण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे याचा शुभारंभ दरे तालुका महाबळेश्वर येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपवन संरक्षक अमोल सातपुते, वाईचे प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे, साताराचे प्रांताधिकारी आशिष बारकुल यांच्यासह



विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उन्हाळ्यामध्ये धरणाची पाणी पातळी कमी होते. पाणी पातळी कमी झाल्यामुळे धरणातील गाळ काढल्यानंतर पाण्याची क्षमता ही वाढते व गाळाचा उपयोग शेतीमध्ये केला जातो. यामुळे शेती अधिक सुपीक व कृषी उत्पन्न जास्त देते. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी फार महत्त्वाची आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी धरणांमधील व तलावांमधील गाळ काढून तो आपल्या शेतात टाकावा व आपली शेत जमीन जमीन सुपीक करून कृषी उत्पन्न वाढवावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# प्रभाग क्र. ०८ मधील नागरी समस्यांचे दैनंदिन निराकरण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्र. ०८ मधील नागरिकांच्या दैनंदिन नागरी समस्यांचे तात्काळ निराकरण करण्यासाठी आज दिवसभरात विविध भागांना भेट देत नागरिकांच्या तक्रारी जाणून घेण्यात आल्या. तसेच दूरध्वनीवर प्राप्त झालेल्या नागरी समस्या निवारण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधत विविध समस्या मार्गी लावण्यात आल्या.



गुरुवार पेठ आणि शुक्रवार पेठ परिसरात मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांचा त्रास वाढल्यामुळे स्थानिक नागरिक, विशेषतः लहान मुलं आणि ये-जा करणारे नागरिक त्रस्त झाले होते. या पार्श्वभूमीवर श्वान पथकाकडून विशेष मोहीम राबवून त्रासदायक भटक्या कुत्र्यांना पकडण्यात आले.

ही मोहीम गुरुवार पेठेतील श्री शंकरलिंग मंदिर परिसर तसेच शुक्रवार पेठेतील श्री चौडेश्वरी मंदिर परिसरात राबवण्यात आली. विशेष म्हणजे, गुरुवार पेठेतील लहान मुलांनी या शोधमोहीमेत श्वान पथकाला मोठी मदत केली.

सदर कारवाई पशुसंवर्धन विभागातील डॉ. निलेश शिरसट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, संबंधित मक्तेदारांकडून कुत्र्यांना पकडण्यात आले. इतर भागांमध्येही ही मोहीम संध्याकाळच्या सत्रात घेण्यात येणार आहे.

शुक्रवार पेठेतील बंद असलेली इलेक्ट्रिक बोरिंग पूर्ववत करण्यात आले. सदर काम सागर पतंगे यांच्या टीमकडून करण्यात आले.

प्रभागातील विविध भागातील तक्रार प्राप्त भागात साफसफाई व स्वच्छता करण्यात आली. सदर काम आरोग्य हमीद हिरोळी, सोमनाथ सिद्धगणेश यांच्या टीमकडून करण्यात आले.

प्रभागातील दैनंदिन नागरी समस्या सोडविण्यासाठी नगरसेवक अमर पुदाले, प्रविण दगोर्पाटील तसेच नगरसेविका सौ. बबिता अनंतकुमार धुम्मा व सौ. गीता गोविंद गवई यांच्या समन्वयातून पार पडत आहे.

# एप्रिल ते जून अन्नधान्याचे आगाऊ वितरण प्रक्रिया प्रभावीपणे सुरू

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत एप्रिल ते जून 2026 या कालावधीतील अन्नधान्याची आगाऊ उचल करून तात्काळ वितरण करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिल्यानंतर राज्य शासनाने या प्रक्रियेला वेग देत युद्धपातळीवर अंमलबजावणी सुरू केली आहे. कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, यासाठी काटेकोर नियोजन करण्यात आले असून सर्व यंत्रणा सक्रिय करण्यात आल्या आहेत, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या दि. 2 मार्च 2026 च्या निर्देशानुसार राज्यात तातडीने पूर्वतयारी सुरू करण्यात आली. त्यानुसार दि. 9 मार्च रोजी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगाऊ उचल प्रक्रियेचे नियोजन, साठा व्यवस्थापन आणि वितरण यंत्रणा सक्षम करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी दि. 10 मार्च रोजी सर्व जिल्ह्यांना निर्देश पाठविण्यात आले.

यानंतर दि. 11 मार्च रोजी भारतीय अन्न महामंडळाच्या (FCI) माध्यमातून आगाऊ उचल संदर्भात आणखी एक बैठक घेण्यात आली. पुढे दि. 17 मार्च आणि 24 मार्च रोजी सर्व जिल्ह्यांना अन्नधान्य उचल आणि वितरणाबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. या प्रक्रियेचा आढावा केंद्र सरकारनेही घेतला असून दि. ६ आणि ७ एप्रिल रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे राज्यातील प्रगतीची समीक्षा करण्यात आली.

अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी दि. 8 एप्रिल रोजी भारतीय अन्न महामंडळाच्या जनरल मॅनेजर यांच्यासोबत विशेष बैठक घेण्यात आली. त्याच दिवशी सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे अन्नधान्य दि. 30 एप्रिल 2026 पर्यंत उचलून वितरण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

वाहतूक व्यवस्थेलाही प्राधान्य देण्यात आले असून संबंधित कंत्राटदारांना पुरेशी वाहने उपलब्ध करून देण्याच्या सूचना दि. 8 एप्रिल रोजी देण्यात आल्या आहेत. त्यामुळे अन्नधान्याची उचल आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत वितरण सुलभ होणार आहे.

दरम्यान, मार्च 2026 महिन्याचे वितरण वेळेत पूर्ण न झाल्याने केंद्र शासनाने दि. 7 एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली होती. त्या अनुषंगाने e-PoS प्रणालीवर वितरण सुरू होते. त्यानंतर दि. 8 एप्रिलपासून एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे एकत्रित वितरण e-PoS मशीनद्वारे सुरू करण्यात आले आहे. सध्या कोणत्याही e-PoS यंत्रणेत तांत्रिक अडचण नसून वितरण प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य शासनाकडून अन्नधान्य उचल आणि वितरणासाठी सुयोग्य नियोजन करण्यात आले असून भारतीय अन्न महामंडळ व जिल्हास्तरीय यंत्रणांशी सातत्याने संपर्क ठेवून येणाऱ्या अडचणींचे तातडीने निराकरण केले जात आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशांची गांभीर्याने दखल घेत राज्य शासनाने या तीन महिन्यांच्या आगाऊ वितरण मोहिमेला गती दिली असून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, यासाठी सर्वतोपरी उपाययोजना केल्या जात आहेत, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# डिजिटल मीडियाच्या महा अधिवेशनाच्या तयारीची राजा माने यांनी केली पाहणी

**पणजी (कटूसत्य वृत्त):-** डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या तिसऱ्या पणजी गोवा येथे ४ मे २०२६ रोजी होणाऱ्या महा अधिवेशनाच्या निमित्ताने सुरू असलेल्या जय्यत तयारीची पाहणी संघटनेचे संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष राजा माने यांनी पणजी येथील कला अकादमी परिसरात जाऊन केली. यावेळी गोवा अधिवेशन कोअर कमिटीची बैठक कला अकादमीच्या कार्यालयात पार पडली यावेळी संघटनेचे गोवा प्रदेशाध्यक्ष अनिल पाटील, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सतीश भाऊ सावंत, महाराष्ट्र महासचिव विकास भोसले, केंद्रीय उपाध्यक्ष महेश कुगावकर केंद्रीय उपाध्यक्ष अमोल पाटील, केंद्रीय महासचिव तेजस राऊत, राज्य उपाध्यक्ष सागर चव्हाण, राज्य प्रसिद्धीप्रमुख धिरज शेळके, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भरत केसरकर, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष तथा स्मरणिका





संपादक भाऊसाहेब फास्के, यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना केंद्रीय अध्यक्ष राजा माने म्हणाले, गोवा येथे होणारे तिसरे राष्ट्रीय अधिवेशन हे ऐतिहासिक अधिवेशन होणार असून गोवा प्रदेशाध्यक्ष अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली संघटनेची सर्व टीम अत्यंत नियोजनबद्ध काम करीत असून देशभरातील हजारो संपादक पत्रकार या अधिवेशनासाठी उपस्थित राहणार असून संघटनेच्या पदाधिकारी व सभासदांनी या अधिवेशनासाठी अधिकृत नाव नोंदणी १५ एप्रिल २०२६ पर्यंत आपापल्या जिल्हाध्यक्ष यांचेकडे करावी.

यावेळी गोवा प्रदेशाध्यक्ष अनिल पाटील म्हणाले, "गोवा राज्याला ऐतिहासिक व पत्रकारितेची मोठी परंपरा आहे. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे गोवा येथे होणारे अधिवेशन अधिक दजेर्दार व सर्वांच्या ज्ञानात भर पडणारे असे होईल यासाठी आम्ही सर्व आपल्या स्वागतासाठी सज्ज झालो

# राजधानीत महात्मा ज्योतिराव फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आज राजधानीत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र सदनाच्या प्रांगणातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी महाराष्ट्र सदनाच्या विशेष आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहाय्यक निवासी आयुक्त स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे आणि महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

# सांगोला-कराड-दापोली बस सेवेला मंजुरी

## शहीद अशोक कामटे संघटनेच्या पाठपुराव्याला यश

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोल्यातून थेट कराड,दापोली कोकणामध्ये जाण्याकरिता बस सेवा सुरू करावी या आग्रही मागणीचे पत्र शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्याकडे केली होती बस सेवा सुरू करण्यास मंजुरी मिळालेली आहे.

सांगोला झकराड -दापोली-सांगोला ही बस सेवा मंगळवार दि. 14 एप्रिल पासून नियमित सुरू होणार आहे या बसचे थांबे व मार्ग नाझरे, आटपाडी, करगणी, भिवघाट, खानापूर, विटा, कडेगाव, कराड, पाटण, कोयनानगर, चिपळूण, खेड, दापोली असणार आहे. सदरची सेवा देण्याकरता सांगोला आगार तत्पर आहे या बस सेवेचे ऑनलाइन आगाऊ आरक्षण महामंडळाच्या संकेतस्थळावर सुरू करण्यात आले आहे.



सदर बस सेवेमुळे कोकण-पश्चिम महाराष्ट्राला जोडणारी अतिशय महत्त्वपूर्ण बससेवा ठरणार असल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सांगोला - दापोली सकाळी 8.00 सांगोल्यातून प्रस्थान करेल व दापोलीतून सकाळी 6 वाजता निघेल. तरी या बस सेवेस या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी या बसने प्रवास करावा असे आवाहन शहीद अशोक कामटे संघटनेच्या वतीने देण्यात आली सदर बस सेवा सुरू होण्याकरता परिवहन मंत्री, विभागातील परिवहन राज्य महामंडळाचे सर्व अधिकारी, आगार प्रमुख विकास पोफळे सांगोला यांचेकडे सातत्याने शहीद अशोक कामटे सामाजिक संघटनेने या मागणीचा पाठपुरावा केला त्यास सर्वांचे सहकार्य लाभले. या पुढील काळात देखील कामटे संघटना प्रवाशांच्या विविध मागण्या व समस्या सोडवण्याकरिता संघटना कटिबद्ध राहणार असल्याचे सांगीतले.शहीद कामटे संघटनेच्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# अंगणवाडी सेविका व मदतनीस २ लाख २१ हजार ३२८ पदास मंजुरी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महिला व बाल विकास विभागात तब्बल २३ वर्षांनंतर ८ हजार ६६९ नियमित पदे भरण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे विभागाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

विभागातील एकूण पदांचा आढावा घेण्यात आला. त्यापैकी काही पदे निरसित (रद्द) करून १६५ नव्या पदांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे विभागासाठी एकूण ८ हजार ६६९ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत.

याशिवाय, विभागाच्या कामकाजासाठी २ हजार ८४३ पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजनेअंतर्गत १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी सेविका व १,१०,६६४ अंगणवाडी मदतनीस, अशी एकूण २ लाख २१ हजार ३२८ मानधनाधारित पदे देखील मंजूर करण्यात आली आहेत.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, २३ वर्षांनंतर घेतलेला हा महत्त्वपूर्ण निर्णय विभागाच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यामुळे महिला व बालकल्याण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल.

# स्वच्छता कराच्या नावाखाली एसटी प्रवाशांकडून कोट्यवधींची वसुली; तरीही बसस्थानके अस्वच्छच!

**कळंब (कटूसत्य वृत्त):-** राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या तिकिटावर आकारलेला दोन रुपयांचा स्वच्छता कर हा सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशावर टाकलेला अतिरिक्त आर्थिक भार असल्याची तीव्र नाराजी राज्यभरातून व्यक्त होत आहे. राज्यात दररोज सुमारे ५५ लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात. त्यामुळे प्रत्येक तिकिटामागे दोन रुपये आकारल्यास महामंडळाच्या तिजोरीत दररोज १ कोटी १० लाख रुपये, महिन्याला ३३ कोटी रुपये, तर वर्षाला तब्बल ४०१ कोटी ५० लाख रुपये जमा होणार आहेत.

इतक्या मोठ्या प्रमाणात निधी जमा होत असताना राज्यातील अनेक बसस्थानके आणि बसेस आजही स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे वास्तव समोर येत आहे. राज्यात सध्या २५१ आगार आणि ५९८ बसस्थानके असून या सर्व ठिकाणची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहे आणि बसची नियमित साफसफाई यासाठी हा निधी प्रभावीपणे वापरण्याची मागणी जोर धरत आहे.

महामंडळाने अलीकडेच सहलीच्या माध्यमातून १२७ कोटी १८ लाख रुपये उत्पन्न मिळवले असून, त्यासाठी २५ हजार ५५८ बस फेऱ्या करण्यात आल्या. गतवर्षीच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाख रुपयांची वाढ झालेली असतानाही प्रवाशांना अपेक्षित सुविधा मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे.

प्रवाशांचे म्हणणे आहे की, अनेक बस वाटेतच बंद पडतात, स्वच्छतेचा अभाव जाणवतो, तर बसस्थानकांवरील परिस्थितीही समाधानकारक नाही. त्यामुळे स्वच्छता करातून मिळणारा निधी नेमका कुठे खर्च होतो, याबाबत पारदर्शकता ठेवावी अशी मागणी पुढे येत आहे.

दरम्यान १५ एप्रिल ते १५ जून हा गर्दीचा उन्हाळी हंगाम सुरू होत असताना महामंडळाने १० टक्के उन्हाळी भाडेवाढ जाहीर करून प्रवाशांना आणखी एक मोठा धक्का दिला आहे. आधीच वाढत्या महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांना आता एसटी प्रवासही महाग होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

एकेकाळी ‘गोरगरिबांची लालपरी’ म्हणून ओळखली जाणारी एसटी आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे. इलेक्ट्रॉनिक बस सेवांमध्ये वाढ झाली असली तरी त्याचे तिकीटदर अनेकांसाठी परवडणारे नसल्याने ‘लालपरी आता श्रीमंतांचीच होत चालली का?’ असा सवाल प्रवासी वर्गातून उपस्थित होत आहे.

# अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणाबाबत १७ व १८ एप्रिलला सुनावणी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात येणार आहे. यासाठी गठीत समितीसमोर आपली मत मांडण्यासाठी संबंधित व्यक्तींनी १५ एप्रिल २०२६ पर्यंत आपले निवेदन किंवा अर्ज सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात आले आहे.

अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण संदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (नि. न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने आपल्या शिफारशींसह अहवाल १६ मार्च २०२६ रोजी शासनास सादर केला आहे. या अहवालाच्या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या गठित समितीसमोर १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी आपली मत मांडता येणार आहे. त्यासाठी संबंधितांनी dg-sw@barti.in या ई-मेल आयडीवर १५ एप्रिल २०२६ पर्यंत आपले निवेदन किंवा अर्ज पाठवावेत.

अर्जासोबत अर्जदाराने आपला दूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

सुनावणीचे ठिकाण, वेळ व इतर तपशील संबंधितांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# जिल्हा नियोजनची विकासकामे वेळेत पूर्ण करा; गुणवत्तेबाबत तडजोड नाही -पालकमंत्री नितेश राणे

**सिंधुदुर्गनगरी (कटूसत्य वृत्त):-** सिंधुदुर्ग जिल्ह्याने मागील आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, चालू वर्षातही हीच गती कायम ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री नितेश राणे यांनी दिले. जिल्हा वार्षिक योजनेच्या आढावा बैठकीत पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व प्रलंबित विकासकामे पूर्ण करण्यात यावीत आणि कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले.पालकमंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक पार पडली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर, पोलिस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, उपवनसंरक्षक मिलीश शर्मा, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तुकाराम साईल, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत बुधावले उपस्थित होते. या बैठकीत पालकमंत्री नितेश राणे यांनी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील प्रलंबित कामांचा आढावा घेतला.विशेषतः गाळ काढण्याची



कामे या महिनाअखेर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री तातडीने खरेदी करण्याचे निर्देश देण्यात आले.

साकव दुरुस्तीला प्राधान्य देत पावसाळ्यापूर्वी ती कामे पूर्ण करण्यावरही भर द्यावा असे पालकमंत्री म्हणाले.

वीज वितरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्परतेने सर्व कामे पूर्ण करावीत, असे निर्देश देताना पालकमंत्र्यांनी विविध विभागांमध्ये समन्वय राखण्यावर भर दिला.

स्वातंत्र्य सेनानी
कै.संदीपान दादा गायकवाड
यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन



-: शुभेच्छुक :-

- मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा संस्था मर्यादित, मोहोळ
- चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, मोहोळ
- चंद्रमौळी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, मोहोळ
- कौशिक (तात्या) गायकवाड मित्र परिवार, मोहोळ
- संदीपान गायकवाड सामाजिक संस्था
- मोहोळ विविध कार्यकारी सेवा सह संस्था मर्यादित
- वरद ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कं लि
- सोलापूर जिल्हा जागतिक मानवाधिकार संघटना

सौजन्यः- स्वातंत्र्य सेनानी संदीपान दादा गायकवाड बहुउद्देशीय व संशोधन संस्था, मोहोळ